# (१०) :राजस्थान:

राजस्थानचा शौर्याचा इतिहास संपूर्ण भारताला ज्ञात आहे. प्राचीन काळी संपूर्ण राजस्थानात अनेक स्वतंत्र राज्य होती. बहुतेक राजानी जैन धर्माला आश्रय दिला होता. राजस्थानमधे कोणतेच सिध्दक्षेत्र आणि कल्याणकक्षेत्र नाहीत. परंतु संपूर्ण राज्यात अनेक ठिकाणी गेल्या दीडशे वर्षापासून उत्खलनांत जिन मूर्त्या श्री महावीरची , श्री तिजारा आदि अतिशय क्षेत्रे निर्माण झाली आहेत. राजस्थानात अनेक वेळा यवन राज्य कर्त्यानी जिन मंदिरे व मूर्त्या उध्वस्त केलेल्या आहेत. परंतु वर्तमान काळात शेकडो जिन मूर्त्या भू गर्भातून प्राप्त होत आहेत. १० व्या व ११ व्या शतकातील जैन राज्य त्यांचे मंत्री अबु यांनी दिलवाडा , राणकपूर आणि जैसलमेर या ठिकाणी संपूर्ण संगमरवरी, अद्वितीय शिल्प रचना करून अती विशाल मंदिराची निर्मिती केलेली आहे. राजस्थानात एकूण ५६ अतिशय क्षेत्रे आहेत. दिंगबर आणि श्वेतांबर जैन अनुयांयाची मंदिरे धर्मशाळा उत्तम असून सर्व सोयीनीयुक्त आहे. श्री तोडरमलजी आणि पंडित सदासुखजी सारखे जैन साहित्यकार राजस्थानमधीलच. तोडरमल ट्रस्ट कडून जैन शिक्षा आणि शोध कार्य उत्तम रितीने जयपूर येथे चालू आहे.

## जयपूर

मार्ग: मुंबई, दिल्ली, अहमदाबाद मार्गे किंवा सोलापूर- राजकोट मार्गे , गांधीधाम मार्गे अहमदाबादवरून जाता येते. जयपूर हे विश्व विख्यात पुरातन शहर असून शहराच्या रचनेवरून पिंक सिटी गुलाबी शहर म्हणतात. कारण तेथील मुख्य रस्तावरील सर्व इमारती गुलाबी रंगाच्या आहेत. जयपूर ही राजस्थानची राजधानी आहे. अध्यात्मिक विद्वान च्पंडित तोडरमलजी, दौलतरामजी, सदासुखजी आदि विद्वानांची जन्मभूमी असून भट्टारकाची गादी आहे. या ठिकाणी अनेक जैन मंदिरे असून ती प्रेक्षणीय आहेत.

(१) मंदिर ठोलियान- संगमरवरी दगडाचे कोरिव काम केलेले अप्रतिम आहे.

(२) मंदिर दिवाण बदीचंदजी साह.

(३)मंदिर गोधन

(४)मंदिर दारोगाजी

(५)मंदिर लनुकरंजी- अंबामाता पद्मावती ज्वालामालीनी देवींची सातिशय प्रतिमा आहेत. चौकडी रामचंद्रजी आणि चौकडी मोदीखाना येथील दिंगबर जैन मंदिर विशाल व भव्य असे असून मंदिरातील मूर्त्या सातिशय आहेत.

(६)नरसिया भट्टारकजी -हे क्षेत्र भव्य असून त्या ठिकाणी जिन मंदिर व मोठा बगीचा आहे.

प्रेक्षणीय स्थळे: हवा महल, जंतरमंतर, चंद्रमहल, कलाकेंद्र, पुराण वस्तु संग्रहालय हे सर्व पाहण्याचे ठिकाण आहेत.

सुविधा: एस टी स्टॅंड जवळील बनी पार्कधर्माथ संस्थान धर्मशाळा, रेल्वे स्टेशन जवळील धर्मशाळा, ठोलियान धर्मशाळा, घी वालोंका रास्ता. येथे सर्व सोयिनीयुक्त आहे.

## अतिशयक्षेत्र - आमेर

मार्ग: जयपूर पासून उत्तरेकडे ९ कि.मी. हे क्षेत्र आहे. कचवाह वंशाची ही जूनी राजधानी होती.

(१) मंदिर सावलजी भगवान नेमिनाथाचे प्राचीन मंदिर.

(१) मंदिर संघीजी

(२) भगवान चंद्रप्रभूची प्राचीन व सातिशय मूर्ती आहे.

सुविधा: जैन धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - सांगानेर

मार्ग:  जयपूर पासून पश्चिमेस १३ कि.मी. अंतरावर हे क्षेत्र आहे. हे राजस्थानातील कुटिर उद्योगासाठी प्रसिध्द असून या ठिकाणी ७ जिन मंदिर आहेत.

(१)  मंदिर संघीजी चोवीस जिनालयाचे शिखर भव्य असून कलात्मक आहेत. या ठिकाणी भ. पार्श्वनाथाची मूर्ती विराजमान आहे.

(२) बगीचंद्रजी मंदिर गुनामी पंथाचे केंद्र आहे.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - पद्मपुरा

मार्ग:   जयपूर पासून जयपूर टोंक सडक मार्गावर २८ कि.मी. क्षेत्र आहे. गेल्या ५० वर्षापासून हे  क्षेत्र अत्यंत प्रसिध्दी पावलेले आहे. सन १९४४ साली भू- गर्भातून भ. पद्मप्रभूची मूर्ती प्राप्त झाली. नवनिर्मित संगमरवरी भव्य गोलाकार मंदिरामध्ये ८५  फूट उंच ही मूर्ती स्थापन केलेली आहे.

सुविधा:  नवनिर्मित धर्मशाळा असून निशुल्क भोजनाची व्यवस्था आहे.

## अतिशय क्षेत्र --महावीरजी

मार्ग: राष्ट्रीय महामार्ग  आणि रेल्वे मार्गाने क्षेत्रावर जाता येते. दिल्ली पासून ३०० कि.मी. आग्रा पासून १७५ कि.मी. आणि जयपूर पासून १४० कि.मी. आहे. महावीरजी रेल्वे स्थानकामधे क्षेत्राकडून बसची व्यवस्था केलेली आहे. स्टेशन पासून क्षेत्र ७ कि.मी. अंतरावर आहे. गंभीरी नदीकाठी चांदनपूरवाले बाबा नावाने देश विदेशात प्रसिध्द असलेले हे स्थान आहे.

१००० वर्षापूर्वी भू- गर्भातून अतिशय मनोज्ञ तपकिरी रंगाची भ. महावीरांची मूर्ती प्राप्त झालेली आहे. भव्य अशा तीन मजली मंदिरात अनेक भगवंताच्या मूर्त्या आहेत. मानस्तंभ, उद्यान,

महाद्वार, अनेक धर्मशाळा मंदिराभोवती आहेत. या ठिकाणी कृष्णाबाई जिनालय आणि आश्रम, श्री कमलाबाई पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर. गंभीरी नदीच्या पलिकडील बाजूस शांतीसागर नगर असून त्या ठिकाणी भव्य अशा जिन मूर्त्या आहेत. आणि गुरू कुल आहे.

सुविधा: मंदिराच्या बाहेर नवनिर्मित सर्व सोयीनीयुक्त धर्मशाळा असून स्वागत कक्षातून यात्रेकरू स धर्मशाळेस आरक्षण करता येते. मंदिर परिसरात अन्नपूर्णा भोजनालय आहे.

## अतिशयक्षेत्र- चमत्कारजी

मार्ग: मुंबई दिल्ली महामार्गावर सवाई माधोपूर स्टेशन पासून ३ कि.मी. हे क्षेत्र आहे. १५० वर्षापूर्वी भू- गर्भातून चमत्कारी अशी भगवान आदिनाथाची स्फ़टीक मणी प्रतिमा प्राप्त झाली. तेव्हा पासून या ठिकाणी जैन अजैन लोक भक्तीभावाने पूजेस येतात. मुस्लीम संत नसीरू द्दीन यांना मूर्तीच्या दर्शनाने शांती मिळाली म्हणून त्यांनी मूर्तीवर छत्री बांधलेली आहे. शेरपूर रणथंबोर सावाई माधोपूर पासून १० कि.मी. अंतरावर ही दोन क्षेत्र आहेत. आणि जिन मंदिर आहेत.

सुविधा: सवाई माधोपूर येथे धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - झालरापाटण

मार्ग: मुंबई दिल्ली रेल्वे मार्गावर कोटा पासून १२ कि.मी. व सडक मार्गे झालवाड पासून ६ कि.मी. अंतरावर हे क्षेत्र आहे. झालरा पाटण शहर एकूण ५ जिनालय आहेत. पैकी भ. शांतीनाथाचे मंदिर अप्रतिम आहे. भ. शांतीनाथाची सातिशय मूर्ती ११ फूट उंच आहे. मंदिराचे प्रवेशद्वार संगमरवरी हत्तीने सजविले आहेत. मंदिराचे शिखर ९० फूट उंच असून मंदिर अतिशय भव्य आहे.

इतर दर्शनिय स्थळे:  द्वारकाधीश मंदिर, प्राचीन महल

सुविधा:  धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र  - चांदखेडी

मार्ग:  इंदोर  झालवाड सडक मार्गे झालवाड पासून ३४ कि.मी. आणि कोटावरूनही क्षेत्रास जाता येते. रूपेली नदी काठी अत्यंत रम्य अशा ठिकाणी भव्य जिनमंदिर असून ६ फ़द्नट उंच पद्मासनातील भ. आदिनाथाची प्रतिमा आहे. हिंदु आणि जैन भक्तीभावाने हजारोंच्या क्षेत्रास भजत असतात. पूर्वी ही मूर्ती भूयारात होती सन १७४६ साली पंचकल्याण महोत्सव होऊन मूर्ती सध्याच्या ठिकाणी विराजमान आहे. मंदिरातील रचना रहस्यमय चमत्कारी असून वास्तुकलेचा अदभूत नमूना आहे. या ठिकाणी एकूण ५२ जिनालय असून भ. महावीर, भ. पार्श्वनाथ, भ.आदिनाथांच्या मनोज्ञ मूर्त्या आहेत. संपूर्ण भारतात अतिशय चमत्कारी मंदिर म्हणून ओळखले जाते. अक्षय तृतीयला मंदिरावर गंधोदकाचा वर्षाव होतो असे मानतात. दि. २०-३-१९७९ रोजी मूर्ती मधून पाण्याचा धारा निघत होत्या हे लोकांनी पाहिलेले आहे.

सुविधा:  मंदिराच्या भोवताली धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - आवा

मार्ग: जयपूर टोंक १५० कि.मी. आणि टोंक पासून ५० कि.मी. हे क्षेत्र आहे. आरवली पर्वतराजीत एका रमणिय स्थळी चोहो बाजूने डोंगर तलाव असल्याने संपूर्ण परिसर मनोहर वाटतो. या ठिकाणी शांतीनाथ जिनालय असून भ. शांतीनाथाची मूर्ती आहे. भक्तीभावाने पूजा केल्याने आपली मनोकामना पूर्ण होते असे भक्ताना वाटते. अनेक चमत्कारी अनुभव असल्याने हजारो भक्तगण दर्शनासाठी येत असतात.

सुविधा: धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र- मालपूरा

मार्ग: जयपूर पासून सडकमार्गे ९ कि.मी. अंतरावर हे क्षेत्र आहे. एकूण १० जिन मंदिरे आहेत. मंदिराच्या चतुर्थ कालीन भ. आदिनाथ बाबा म्हणून मूर्ती हिंदुचे कल्याणकजी मंदिर आहे.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र -- बघेरा

मार्ग: अजमेर पासून ९७ कि.मी. अंतरावर नदी किनारी हे क्षेत्र आहे. वेळोवेळी सतत भू-गर्भातून अनेक सातिशय जिन मुर्त्या प्राप्त झाल्या. इ.स. १९७५ साली सर्वाधिक एकूण २४ जिनमुर्त्या भू-गर्भातून प्राप्त झाल्या. या सर्व मूर्त्या भगवान शांतीनाथ मंदिरात प्रतिष्ठित केलेल्या आहेत. जवळच्या पाहाडावर सुध्दा अनेक जैन मूर्त्या सापडतात.

सुविधा: मंदिरा शेजारी धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - चितौडगड

मार्ग:  अजमेर खंडवा रेल्वे मार्गावर अजमेर पासून २०० कि.मी. आणि उदयपूर पासून ११७ कि.मी. अंतर आहे. भारतीय इतिहासामध्ये राणा कुंभा, राणा संग, राणा प्रताप आपल्या वीरतेसाठी आणि पद्मीनी शक्तीसाठी , पन्नादाई आत्मबलिदानासाठी , मीरा, रोहिदास आपल्या आध्यात्मिक शक्तीसाठी चित्तोडगड प्रसिध्द आहे.पर्यटकाचे महत्वाचे केंद्र आहे. १० व्या शतकात निर्माण झालेले शांतीनाथ मंदीर, राणा कुंभाद्वारा विजय स्तंभा प्रमाणे १७५ फूट ७ मजले उंच विशाल स्तंभ असून जैन मुर्त्या कोरलेल्या आहेत. भ. पार्श्वनाथाचे मंदिर प्राचीन असून अतिशय म्हणविले जाते.

सुविधा:  अनेक पर्यट्क गृह, विश्रामगृह, धर्मशाळा आहेत.

## अतिशय क्षेत्र  नाथद्वारा

मार्ग:  उदयपूर पासून ४८ कि.मी. अंतर आहे. भ. श्रीकृष्णाचे चमत्कारी श्रीनाथजी मंदिर लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. द्वारकेश श्रीकृष्ण मंदिर पाहण्यासारखे आहे.

सुविधा: नाथद्वारा येथे धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र  - उदयपूर

मार्ग: हे शहर राजस्थानातील मोठे प्राचीन आणि ऐतिहासिक शहर आहे. सडक आणि रेल्वे मार्गे अहमदाबादवरून २६० कि.मी. आहे. अनेक तलावाचे शहर आणि राजवाड्याचे शहर म्हणून ओळखले जाते. १० जिन मंदिरे असून भ. पार्श्वनाथाची सातिशय प्रतिमा विराजमान आहे. पंडित दौलतराम यांनी त्या ठिकाणी साहित्य निर्मिती केलेली आहे.

प्रेक्षणीय स्थळे: राजमहल, जगधीश मंदिर, सहेलियोंकी बाडी, एकलिंगजी मंदिर, हल्दीघाट प्रसिध्द स्थळ आहेत.

सुविधा: धानमंडी, तेलीवाडा अशोकनगरमधील जैन धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - केशरियानाथ

मार्ग: उदयपूरपासून ६५ कि.मी. अंतरावर एक क्षेत्र आहे. राजस्थानमधील सर्वात प्राचीन क्षेत्र मानले जाते. मुलनायक भ. वृषभदेवाची ३ फूट पद्मासनातील प्रतिमा भिल्ल लोकांनी प्राचीन काळी भुगर्भातून काढली. तेव्हापासून हिंदु श्वेतांबर आणि दिंगबर जैन बरोबरीने ह्या क्षेत्राला मानतात भिल्ल लोक कालाजी , कारिया बाबा असे म्हणतात. एका भव्य किल्लेवजा तटबंदी शिल्पकलेने नटलेले मंदिर आहे. अनेकवेळा यवनानी ते मंदिर लूटण्याचा प्रयत्न केला परंतू चमत्कार होऊन त्यांना परत जावे लागले. भावीक लोक मनोकामना पूर्ण होण्यासाठी केशर गुळ आदींचा नैवद्य दाखवतात.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र - ओबरी डेंचा

मार्ग: डुंगरपूर सडक मार्गे ३५कि.मी.क्षेत्र आहे. ओबरी गावात एक अतिशय मनोज्ञ काच मंदिर असून भव्य मानस्तंभ दर्शनीय आहे. ओबरी गावाजवळ दोन जिनमंदिरे असून एक भगवान पार्श्वनाथाची पंचधातूची मुर्ती, दुसरी भगवान आदिनाथाची असून चतुर्थ कालीन मुर्ती आहे. प्रत्येक पौर्णिमेला या ठिकाणी यात्रा भरते. हजारो भाविक मनोकामना पूर्ण करण्यासाठी येत असतात.

सुविधा: ओबरी आणि डेंचा येथे धर्मशाळा आहेत.

## अतिशयक्षेत्र  - नाकोडा पार्श्वनाथ

मार्ग: बारमेट जिल्ह्यात बालोतर नगरपासून १० कि.मी. दूर बालोतर रेल्वे जंक्शन आहे. त्या ठिकाणावरून क्षेत्रावर जाता येते. राजस्थानमधील पश्चिम विभागात वालूकामय भागात हे रम्य क्षेत्र आहे. अत्यंत प्राचीन असून श्वेतांबर जैन अनुयायींचे महत्वाचे नाकोडा पार्श्वनाथ प्रसिध्द आहे. अनेक वेळा मुस्लीम शासकाकडून नष्ट झाले होते. तरी परत पुन:निर्मिती झाले आहे. नाकोडा गावातून  मूल प्रतिमा या मंदिरात प्रतिष्ठित केलेली आहे. या मंदिराच्या बाजूला भैरवजी वृषभप्रभू जिनालय चौमुखी मंदिर अति प्राचीन आहेत. मंदिराचे शिल्प भव्य आहे.

सुविधा: धर्मशाळा आहेत.

## बिकानेर

मार्ग:  बिकानेर शहर जयपूरपासून ३२५ कि.मी. अंतरावर आहे. बिकानेर शहरात रेल्वे स्टेशन ५ कि.मी. अंतरावर भांडासर दि. जैन क्षेत्र आहेत. हे मंदिर कलाकुसर आणि रंग कामासाठी प्रसिध्द आहे. मुलनायक भ. सुमतीनाथांची प्रतिमा आहे. येथील चित्रकला रंगकाम कोरिव काम अतिशय शोभायमान असून मंदिराचा प्रदक्षिणा मार्ग कलाकुसरीने शोभिवंत केलेला आहे.

प्रेक्षणीय स्थळे:  जुनागड, बिकानेर महाल, लक्ष्मी नारायण मंदिर, संस्कृत पुस्तकालय पहाण्यासारखे आहेत.

सुविधा:  स्टेशन जवळ जैन धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र लाडनू

मार्ग: दिल्ली जोधपूर रेल्वे मार्गावर दिल्लीवरू न ४०० कि.मी. आणि जयपूरवरू न सडक मार्गे २०० कि.मी. अंतरावर आहे. लाडनू हे प्राचीन ऐतिहासिक शहर असून वर्तमान काळी अनेक जैन मूर्त्या भू-गर्भातून प्राप्त झालेल्या आहेत. सर्वात प्राचीन जिनमंदीर कलापूर्ण असून जमिनीपासून ११ फूट खाली निर्माण केले आहे. मूलनायक भ. शांतीनाथाची मनोरम प्रतिमा आहे. रात्री लाईटमध्ये अत्यंत सुंदर दिसते. कलापूर्ण तोरण आहे. श्वेतांबर जैन समाजाचे विश्व भारती संस्थान असून दर्शन, साहित्य आणि शोध संस्था आहेत.

सुविधा: जैन धर्मशाळा आहेत.

## अजमेर

मार्ग: उदयपूरहुन १०० कि.मी. व इतर शहरावरू न प्रमुख सडक मार्गे आणि रेल्वेने अजमेरला जाता येते. हिंदु, मुस्लिम जैन संस्कृतीचे माहेर घर आहे. या ठिकाणी एकूण २५ जिनालय आहेत. पैकी

(१) सिध्दकुट चैत्यालय नसीया सोनिजिकी नसीया म्हणून प्रसिध्द आहे. मुल नायक भ. आदीनाथाची मूर्ती आहे. १८६५ साली मूलचंद सोनीजी कडून स्थापीत झालेली असून ४०० किलो सोन्याचा वापर मंदिराच्या कलेसाठी करण्यात आला. दोन मजली मंदिर असून कलापूर्ण आहे.

(२) महापूत जिनालय शहराच्या मध्यभागात आहे.

(३) छोटा गडानसिया २० पंथीचे मंदिर असून मुलनायक भ. आदीनाथाचे मुर्ती आहे.

(४) सिंमधर जिनालय वितराग विज्ञान भवन हे स्वाध्याय भवन दोन मजली असून कलापूर्ण आहे. नवनिर्मित क्षेत्र नेरली अजमेर पासून ८ कि.मी. अंतरावर अरवली पर्वत श्रेणीमध्ये भारतातील लघु सम्मेद शिखर, त्रिमुर्ती जिनालय, नंदेश्वर मंदिर, सहस्त्रकुट जिनालय, उदासिन आश्रम आदी नवनिर्मित संस्था आचार्य १०८ विद्यासागर मुनींचे शिष्य श्री १०८ सुधा सागरजी महाराजांचे प्रेरणेने करोडो रूपये खर्च करून निर्माण होत आहे.

प्रेक्षणीय स्थळे: खाजा मैनुद्दीन दरगाह, पुष्कर तीर्थ, अनासागर, बारादरी, तारागड किल्ला आदी पाहण्यासारखे आहेत.

सुविधा: पृथ्वीराज रोड येथे जैन धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र- व्यावर

मार्ग: अजमेर पासून ५३ कि.मी. अंतरावर आहे. १५० वर्षापूर्वी इंग्रजाद्वारा बसविलेले हे शहर असून क्रांतीकारी धार्मिक कारणासाठी प्रसिध्द आहे. या ठिकाणी ६ दि. जैन मंदिरे आहेत. पंचायती मंदिर अत्यंत प्राचीन मंदिर, भ. आदिनाथाची प्रतिमा आहे. एक जिनमंदिर कलापूर्ण संगमरवरी असून या ठिकाणी दूर्मिळ सोने- चांदी राणीवाला नसीया मध्ये धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र- लुणवा

मार्ग: नागोर जिल्ह्यात छोटेसे गाव लुणावा जउपूरपासून ४० कि.मी. अंतरावर आहे. या ठिकाणी दोन मंदिर असून एक भू-गर्भातून चमत्कारीक रितीने भ. चंद्रप्रभू, भ. शांतीनाथ आणि क्षेत्रपाल मुर्त्या प्राप्त झाल्या, त्यामुळे या ठिकाणी भव्य मंदिर बांधुन मूर्तीची प्रतिष्ठा केलेली आहे. लुणावा गावात दोन जिनमंदिर आहेत. हजारो भक्त गण मनोकामना पूर्ण करण्यासाठी येत असतात. या ठिकाणी प्राचीन ग्रंथभांडार विशाल असून गुरू कुल आणि स्वाध्याय भवन आणि औषधालय आहेत.

सुविधा: धर्मशाळा असून नि:शुल्क भोजन व्यवस्था आहे.

## अतिशयक्षेत्र - बसवा

मार्ग: जयपूरहून सडक मार्गे १०५ कि.मी. अंतरावर आहे. छहढालाचे रचियेता पंडित दौलतरामजी यांची जन्म भूमी असून चार दिंगबर जैन मंदिर आहेत. कालाबाबा नावाची प्रसिध्द भगवान आदिनाथाची सातिशय प्रतिमा आहे. धातुची नंदेश्वार मंदिर रचना असून प्राचीन ग्रंथ भांडार विपुल आहेत.

सुविधा: धर्मशाळा आहे.

## अतिशयक्षेत्र - तिजारा

मार्ग: अलवर पासून ३८ कि.मी. दिल्लीवरून १०० कि.मी. बस मार्गे जाता येते. बस स्टॅंडवरून संस्थेकडे बसची सोय आहे. हे अतिशय क्षेत्र असून याला अत्यंत भव्य इतिहास आहे. सन १९५६ साली भू-गर्भातून ही सातिशय प्रतिमा भ. चंद्रप्रभूची प्राप्त झाली. तेव्हा पासून या क्षेत्राचे महत्व वाढत गेले. भव्य अशा सभा मंडपामध्ये एका सुंदर नक्षी कामाच्या सिंहासनावर भ. चंद्रप्रभूची छोटी प्रतिमा विराजमान आहे. आधुनिक विशाल बांधकाम भव्य मानस स्तंभ आणि मंदिरा भोवताली शेकडो धर्मशाळा यामुळे मंदिराची भव्यता वाढलेली आहे. या ठिकाणी अखंड ज्योत तेवत असते. गावामध्ये एक प्राचीन पार्श्वनाथ जिनालय असून भव्य आहे. येथील काच मंदिर अप्रतिम आहे. तेथे विद्युत चित्र प्रदर्शन अप्रतिम असून मनोरम आणि जैन इतिहास अनेक छोट्या छोट्या मूर्तीद्वारे दाखविले जाते.

सुविधा: अनेक धर्मशाळा असून श्रीमती कमलादेवी गंगवाल ट्रस्ट यांचेकडून भक्ताना नि:शुल्क भोजन दिले जाते.